# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, मंगळवार, दिनांक २० जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३२८ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- +वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### सुशिक्षित उमेदवारांना का नाकारले

यंदाच्या महापालिका निवडणुकीत मतदारांनी अनेक मातब्बर उमेदवारांना चांगलेच पाणी पाजले. काँग्रेस आणि शरद पवार गटासह भाजपच्या उमेदवारांना पराभवाचे तोंड पहावे लागले. त्यात भाजपचे नेते आणि अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम, प्रगती पाटील, शरद पवार गटाचे माजी आमदार प्रकाश गजभिये, दुनेश्वर पेठे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने यांच्या पत्नी डॉ. सरीता माने, माजी नगरसेवक मनोज सांगोळे यांचा प्रामुख्याने समावेश आहे. धर्मपाल मेश्राम आणि प्रगती पाटील यांचे पक्षात चांगलेच स्थान आहे. दुनेश्वर पेठे, मनोज सांगोळे, प्रकाश गजभिये हे देखील लोकांमध्ये प्रिय आहेत. तरीही मतदारांनी त्यांना का नाकारले हा प्रश्न आहे. डॉ. सरीता माने यांना राजकीय वारसा नाही. त्यांचे पती डॉ. मिलिंद माने हे एकदा भाजपकडून आमदार म्हणून निवडून आले होते. मतदारांनी पक्ष न पाहता एका सुशिक्षित उमेदवाराच्या झोळीत भरभरून मते टाकली होती. परंतु, मतदारसंघाच्या विकासाच्या नावावर त्यांची कामगिरी शून्य ठरली. त्यामुळे दुसऱ्यांदा मतदारांनी डॉ. माने यांना नाकारले होते. त्याचाच फटका डॉ. सरीता माने बसला. मनोज सांगोळे यांनी विधानसभेच्या वेळी बसपाकडून निवडणूक लढविली होती. महापालिका निवडणुकीत त्यांनी अजित पवार गटाचा झेंडा हाती घेतला होता. त्यामुळे मतदारांनी त्यांनाही नाकारले. प्रगती पाटील यांना मतविभाजनाचा फटका बसला. धर्मपाल मेश्राम यांचेही तसेच झाले. निवडणूक आली आणि गेली. आता या पडेल उमेदवारांना नव्या ताकदीने मैदानात उतरावे लागणार आहे.

## मेफेड्रोन आणि गांजासह आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**नागपूर, दि. १९**

मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या सूरज उर्फ नव्वा प्रमोद गजभिये (३५) नंदनवन झोपडपट्टी यास पोलिसांनी अटक करून त्याच्या ताब्यातून ३ लाख ७६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

सूरज उर्फ नव्वा हा मेफेड्रोनची तस्करी करतो अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे पोलिस त्याच्या मागावर होते. १८ जानेवारीच्या पहाटे तो राजेंद्रनगर येथील ७ क्रमांकाच्या गल्लीत असताना पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांना पाहून त्याने पळ काढला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ ३ लाख ३५ हजाराचे ६७ ग्रॅम मेफेड्रोन मिळून आली. त्याचप्रमाणे त्याच्याजवळ गांजा देखील मिळाला. पोलिसांनी मेफेड्रोन, गांजा, रोख १० हजार रुपये आणि मोबाईल असा ३ लाख ७६ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नंदनवन पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून सूरज यास अटक केली. ही कारवाई पो. नि. गजानन गुल्हाने, सहायक निरीक्षक संदीप जाधव, उपनिरीक्षक नागेश पुन्नावाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली.

# महापौरपदाचा बिगुल वाजला!

■ २९ महापालिकांतील महापौर आरक्षण सोडत २२ ला

■ मुंबईच्या सत्तासमीकरणांना वेग

मुंबई । विशेष प्रतिनिधी

राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौरपदाचा मार्ग अखेर स्पष्ट होणार असून, महापौर आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. नगरविकास विभागाने याबाबत पत्र काढत दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मंत्रालयात आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. या निर्णयामुळे मुंबईसह संपूर्ण राज्यातील महापालिकांच्या राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे.



महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून काढण्यात आलेल्या पत्रानुसार, राज्यातील २९ महानगरपालिकांमधील महापौर पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी ही सोडत काढली जाणार आहे. ही प्रक्रिया नगरविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील परिषद सभागृहात पार पडणार आहे. आरक्षण जाहिर होताच, महापौरपदासाठीच्या सत्तासंघर्षाचा खरा अंक सुरू होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

विशेषतः मुंबई महापालिकेसाठी ही सोडत अत्यंत निर्णायक मानली जात आहे. मुंबईत महापौरपद कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होते, यावरच सत्तास्थापनेचे गणित, युती-अनुयुती आणि पडद्यामागील राजकीय डावपेच अवलंबून असणार आहेत. गेल्या काही दिवसांपासून महापौरपदावरून सुरू असलेला राजकीय गदारोळ आता आरक्षण जाहीर होताच निर्णायक वळण घेणार आहे.

राज्यातील इतर महापालिकांमध्येही या सोडतीकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. आरक्षण ओबीसी, महिला, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती यापैकी कोणत्या प्रवर्गात जाते, यावर स्थानिक पातळीवरील सत्ता समीकरणे बदलणार आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी आधीच संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत आली असून, पक्षांतर्गत लॉबिंगही वेगात सुरू आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, आरक्षण जाहीर झाल्यानंतरच प्रत्यक्ष सत्तास्थापनेचा दावा केला जाईल. तोपर्यंत सर्व पक्ष 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेत सावध हालचाली करत आहेत. मुंबईत तर महापौरपदाच्या आरक्षणावरच पुढील पाच वर्षांचे प्रशासन, स्थायी समितीचे नियंत्रण आणि महापालिकेच्या महत्त्वाच्या निर्णयांची दिशा ठरणार आहे.

एकूणच, महापौरपदाच्या आरक्षण सोडतीने राज्याच्या स्थानिक राजकारणाचा ताप पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. मंत्रालयात होणाऱ्या या सोडतीकडे केवळ नगरसेवकच नव्हे, तर संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, कोणाच्या गळ्यात सत्तेची माळ पडते याचा फैसला काही तासांत होणार आहे.

# संदीप जोशी यांचा राजकारणातून संन्यास



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि आमदार संदीप जोशी यांनी सक्रिय राजकारणातून संन्यास घेत असल्याची घोषणा सोमवारी सकाळी केली. सध्याची राजकीय संस्कृती, पक्षांतर आणि निष्ठावान कार्यकर्त्यांवरील अन्यायाबाबत त्यांनी स्पष्टपणे आपली भूमिका मांडली आहे. १३ मे रोजी आमदारकीची मुदत संपल्यानंतर कोणतेही पद स्विकारणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले. संदीप जोशी हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अगदी जवळचे मित्र आहेत. फडणवीसांना देवाभाऊ अशी ओळख देण्यात जोशी यांचा मोठा वाटा आहे असे असतानाच सुद्धा त्यांनी राजकारणातून संन्यास घेतल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

आठ दिवसांपूर्वी झालेल्या महापालिकेच्या निवडणुकीत भाजपमध्ये उमेदवारी नाट्य पहायला मिळाले. अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना उमेदवारी न मिळाल्यानंतर त्यांच्या नाराजी नाट्य पहायला मिळाले होते. जोशी यांचे निकटवर्ती निशतकर आणि काही लोकांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्याऐवजी नवीन चेहऱ्यांना संधी देण्यात आली होती. त्यामुळे जोशी पक्षावर नाराज होते. भाजपमधील काही नवीन आणि तरुण चेहऱ्यांना पक्ष अधिक संधी देत जुन्या कार्यकर्त्यांवर अन्याय करीत असल्याची भावना भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आहे. महापालिका निवडणुकीत जोशी हे कुठेही दिसून आले नाहीत. त्यामुळे त्यांनी राजकारणातून संन्यास घेत पक्षाला रामराम केल्याची माहिती आहे.

**...आता मला थांबायच : जोशी**

यानंतर संदीप जोशी यांनी प्रसिद्धिला दिलेल्या पत्रकात म्हटले की, आता मला थांबायच. मी आता ५५ वर्षांचा झालोय. स्वतः ची जागा रिक्त करण आणि तरुण रकाला समोर जाऊ देणे हे सुद्धा आवश्यक आहे. त्यामुळे माझ्या पुढील राजकीय वाटचालीला मी पूर्ण विचारांती पूर्णविराम देत आहे. पक्षाने मला माठे केले याची मला जाणीव आहे. त्यामुळे या पक्षाचे शीर्षस्थ नेतृत्व नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माफी मागून निर्णय जाहीर करीत असल्याचे म्हटले आहे. यानंतर गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटर आणि इतर संघटनांकडे पूर्ण वेळ लक्ष देणार असल्याचे पुढे त्यांनी म्हटले.

**कलाप्रेमी जोशी**

राजकारणात येण्यापूर्वी संदीप जोशी अभिनय क्षेत्रात कार्यरत होते. वयाच्या १९ व्या वर्षी प्रख्यात दिग्दर्शक राजदत्त यांच्या चित्रपटात काम केले आहे. वजीर चित्रपटाचे दिग्दर्शक उज्ज्वल ठेंगडी यांच्या राजे शिवछत्रपती या नाटकात जोशी यांना शिवाजी महाराजांची भूमिका दिली होती. त्यावेळी जोशी हे भाजपशी असल्याने त्यांनी या भूमिकेला स्पष्टपणे नकार दिला होता.

जोशी यांचा आमदारकीचा कार्यकाळ १३ मे रोजी संपणार असल्याने पुन्हा त्यांना संधी देण्यात येणार नव्हती अशीही चर्चा आहे. तोपर्यंत त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला अशीही माहिती आहे.

# ओबीसी बहुजन पक्ष व काँग्रेसची आघाडी

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका एकत्रित लढणार



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९**

प्रकाश शेंडगे यांच्या नेतृत्वाखालील ओबीसी बहुजन आघाडी व काँग्रेस पक्षाची आघाडी झाली आहे. ही एक वैचारिक आघाडी असून आगामी जिल्हा परिषद निवडणुका एकत्रित लढू असा निर्णय यावेळी घेण्यात आल्याची घोषणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

ओबीसी बहुजन पक्षाचे नेते प्रकाश आण्णा शेंडगे यांनी त्यांचे सहकारी चंद्रकांत बावकर, जे. टी. तांडेल, पांडुरंग मिरगळ यांनी टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्षांसोबत सविस्तर चर्चा केली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आघाडीची घोषणा केली, ते पुढे म्हणाले की, ओबीसी बहुजन आघाडीने काँग्रेससोबत काम करण्याचा निर्णय घेतला त्याचे मी स्वागत करतो. ही आघाडी केवळ सत्तेसाठी नसून एका व्यापक भूमिकेतून सामाजिक न्यायासाठी झाली आहे. राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची आग्रही मागणी केल्यानंतर मोदी सरकारला त्याचा निर्णय घ्यावा लागला पण अजून ही जातनिहाय जनगणना झालेली नाही. ज्यांची जेवढी लोकसंख्या तेवढी भागिदारी ही काँग्रेसची भूमिका आहे. राहुल गांधी यांच्या या भूमिकेला सर्व समाजातून पाठिंबा मिळत आहे. धनगर, ओबीसी समाजाचे योग्य प्रतिनिधित्व असावे यावर भर दिला जाईल.

भाजपाची सत्ता आल्यावर पहिली सही धनगर समाजाच्या आरक्षणाची करेन असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीमध्ये २०१४ साली दिले होते पण आजपर्यंत त्याची पूर्तता केलेली नाही. फडणवीस यांनी धनगर, ओबीसी, मराठा, आदिवासी समाजाची आरक्षणाच्या नावाखाली फसवणूक केली आहे. जाती जातीत भांडणे लावण्याचे काम त्यांनी केले आहे. या समाजाचा भाजपा व फडणवीस यांच्यावरचा विश्वास उडाला आहे, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

यावेळी प्रकाश शेंडगे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाचे लचके तोडण्याचे काम केले जात असून २७ टक्के आरक्षणावरही घाला घातला जात आहे. जीआर वर जीआर काढले जात आहेत पण कोणत्याच समाजाला त्याचा फायदा होत नाही. ओबीसी समाजाला न्याय मिळावा यासाठी स्वतंत्र पक्षाची स्थापना करुन समविचारी पक्षाशी आघाडी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. जातनिहाय जनगणनेची भूमिका घेतल्याबद्दल राहुल गांधी यांचे आम्ही आभार मानतो. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालीच ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वास प्रकाश शेंडगे यांनी व्यक्त केला.

## नंदनवन येथे चोरी

**नागपूर, दि. १९**

नवीन नंदनवन येथील पांडव कॉलेजजवळ राहणाऱ्या सागर अजाबराव लोणे (३१) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी १ लाख ५७ हजाराचा ऐवज चोरून नेला.

१७ जानेवारी रोजी सायंकाळी आपले घर कुलूपबंद करून लोणे हे कुटुंबियांसह नरखेडे येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते. अज्ञात चोरांनी मुख्य दाराचा कुलूपकोंडा तोडून घरात प्रवेश केला आणि लाकडी कपाटात ठेवलेले रोख ५० हजार रुपये आणि सोन्याचांदीचे दागिने असा १ लाख ५७ हजाराचा ऐवज चोरून नेला.

## अंगावर झाड पडून इसमाचा मृत्यू

**नागपूर, दि. १९**

झाड तोडत असताना झाड अंगावर पडून संघपाल महादेव भस्मे (४८) रा. जोगीनगर या इसमाचा मृत्यू झाला. १७ जानेवारी रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास संघपाल हा केंद्रीय कपास अनुसंधान संस्थेसमोरील झाड तोडत होता. झाड तोडत असताना अचानक झाड त्याच्या अंगावर पडून तो गंभीर जखमी झाला. उपचारासाठी त्याला मेडिकलमध्ये भरती केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

## 'मुंबई सोडू नका!'

# भाजपकडून नवनिर्वाचित नगरसेवकांना कडक सूचना

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९**

मुंबई महापालिकेतील सत्तास्थापनेचा खेळ निर्णायक टप्प्यात पोहोचत असतानाच भारतीय जनता पक्षाने नवनिर्वाचित नगरसेवकांसाठी स्पष्ट आणि कडक सूचना जारी केल्या आहेत. ''पुढील आठ दिवस मुंबईबाहेर कुणीही जाऊ नये'' असा थेट संदेश भाजपच्या वरिष्ठ पातळीवरून देण्यात आला असल्याची माहिती आहे. महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी आठ ते दहा दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता लक्षात घेऊन ही खबरदारी घेतल्याचे बोलले जात आहे. महापालिका निवडणुकीत संख्याबळात अव्वल ठरलेला भाजप सध्या प्रत्येक हालचाल मोजून टाकत आहे. महापौरपदाचे आरक्षण जाहीर होणे हा सत्तास्थापनेच्या दाव्याचा महत्त्वाचा टप्पा असल्याने, तोपर्यंत कोणतीही धोकादायक पोकळी निर्माण होऊ नये, यासाठी नगरसेवकांना शहरातच उपलब्ध राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सूत्रांच्या मते, सत्तासंघर्षाच्या या निर्णायक क्षणी एकही दुवा सैल पडू नये यासाठी पक्ष विशेष दक्षता घेत आहे.

राजकीय वर्तुळात याला 'हाय-अलर्ट मोड' म्हणून पाहिले जात आहे. महापालिकेतील समीकरणे अजून स्थिर नसताना, पडद्याआड हालचाली, चर्चांच्या फेऱ्या आणि दबाव-राजकारणाला वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपकडून ही सूचना देण्यात आल्याचे मानले जाते. ''सगळे नगरसेवक शहरातच असतील, तर निर्णयाच्या क्षणी पक्षाची एकजूट आणि उपस्थिती अबाधित राहील,'' असा पक्षाचा हिशोब आहे.

महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतरच भाजप औपचारिकरीत्या सत्तास्थापनेचा दावा करणार असल्याचे संकेत आहेत. तोपर्यंत कोणत्याही अफवा, फोडाफोडीचे प्रयत्न किंवा राजकीय खेळींना वाव मिळू नये, यासाठीच ही रणनीती आखण्यात आल्याची चर्चा आहे. सत्तास्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ, मित्रपक्षांशी समन्वय आणि कायदेशीर प्रक्रिया यांचा मेळ घालत भाजप अंतिम चाली खेळण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.

## मंडई, कुस्ती आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी गावकरी मंत्रमुग्ध

**रामटेक, दि. १९**

मकर संक्रांतीनिमित्त हमलापुरी येथे तीन दिवसीय मंडई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख आकर्षण कुस्ती स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम होते. पंचायत समितीचे माजी सभापती नरेंद्र बंधाटे आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हमलापुरी गावात १५ ते १८ जानेवारीला रविवारी मंडई महोत्सवाची सांगता झाली.

दि. १५ जानेवारीला सकाळी ८ वाजता ग्राम स्वच्छता मोहिमेने या महोत्सवाची सुरुवात झाली. दुपारी कुस्ती स्पर्धा झाली. सायंकाळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, खेळाडू, प्रशिक्षक, शिक्षक, कुस्तीगीर, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा समावेश होता. माजी सभापती नरेंद्र बंधाटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

## गिट्टीखदान हद्दीत २.२० लाखांची चोरी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९**

गिट्टीखदान हद्दीत लोकनिवास सोसायटी येथे राहणाऱ्या पीयुष किशोर चौधरी (४०) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी २ लाख २० हजाराचा ऐवज चोरून नेला.

पीयुष चौधरी यांची मुलगी आजारी असल्याने तिला दवाखान्यात भरती करण्यात आले होते. १६ जानेवारीला रात्री दहाच्या सुमारास आपल्या घराला कुलूप लावून चौधरी दवाखान्यात गेले होते. अज्ञात चोरांनी त्यांच्याकडे घरफोडी करून रोख ६० हजार रुपये आणि सोन्याचांदीचे दागिने असा २ लाख २० हजाराचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# मुंबईत सत्तेचा शिक्का स्पष्ट! अफवांना पूर्णविराम

## महायुतीचाच होणार महापौर

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९**

मुंबई महानगरपालिकेतील सत्तासमीकरणांवर सुरू असलेल्या चर्चांना आणि राजकीय तर्क-वितर्कांना अखेर ठाम पूर्णविराम मिळाला आहे. ''जिथे आम्ही युती म्हणून निवडणूक लढलो, तिथे महायुतीचाच महापौर होणार'' असे स्पष्ट शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर करून मुंबईसह राज्यभरातील महापालिकांबाबतचा संभ्रम दूर केला. मुंबई महापालिकेत शिवसेनाभाजप महायुतीने एकत्रितपणे निवडणूक लढवली आहे. निकालानंतर कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने आणि शिवसेनेचे नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवल्याच्या पार्श्वभूमीवर राजकीय बाजारात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले होते. मात्र, ''मुंबईत महायुतीचाच महापौर होईल'' या ठाम घोषणेतून शिंदे यांनी सर्व शंकाकुशंका दूर केल्या.

शिंदे यांनी ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर यांसह ज्या-ज्या महानगरपालिकांमध्ये शिवसेनाभाजप महायुती म्हणून निवडणूक लढली आहे, त्या सर्व ठिकाणी महायुतीचाच महापौर बसवण्यात येईल, हेही स्पष्ट केले. ''नागरिकांनी महायुतीवर विश्वास टाकून मतदान केले आहे. त्या विश्वासाशी प्रतारणा करून कोणताही वेगळा निर्णय घेतला जाणार नाही,'' असे ठाम सांगत त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मुंबईकरांना केले.

मुंबईत वेगळी राजकीय समीकरणे आकाराला येत असल्याच्या चर्चांवरही शिंदे यांनी थेट फटकारा दिला. ''या चर्चांमध्ये कोणतेही तथ्य नाही. मुंबईत शिवसेनाभाजपरिपाइं महायुतीचाच महापौर होईल,'' असे त्यांनी ठासून सांगितले. यामुळे महापालिकेतील सत्तास्थापनेवर पडलेले प्रश्नचिन्ह दूर झाले असून, महायुतीची रणनीती आणि शिस्त दोन्ही स्पष्ट झाल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे.

# मुंबईचा ''महापौर'' कार्पोरेटर ठरवणार नाहीत, तर कॉर्पोरेट ठरवेल!

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९**

मुंबईचा पुढचा महापौर कोण होणारहा प्रश्न आता महापालिकेच्या सभागृहात कमी आणि कॉर्पोरेट बोर्डरूममध्ये अधिक ठरतोय, अशी तीव्र चर्चा शहराच्या राजकारणात पेटली आहे. कागदोपत्री नगरसेवक मतदान करतील; प्रत्यक्षात मात्र पैसा, ठेके, प्रकल्प, टीडीआरएफएसआय आणि लॉबिंग हेच सत्तेची दिशा ठरवतील, असा आरोप उघडपणे केला जात आहे.

देशातील सर्वात श्रीमंत स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकाकडे हजारो कोटींचं बजेट आहे. रस्तेपूल, पुनर्विकास, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, मेट्रो, कोस्टल रोडया प्रत्येक क्षेत्राभोवती कॉर्पोरेट हितसंबंधांची घट्ट जाळी विणली जात आहे. त्यामुळे ''महापौर कोण?'' हा प्रश्न ''कोणत्या कॉर्पोरेटला कोण चालतो?'' अशा पातळीवर ढकलला जातोय, असा रोखठोक आरोप राजकीय वर्तुळातून होत आहे. महापालिकेच्या सेवांच्या खाजगीकरणाचा वेग हेच या खेळाचं केंद्र आहे. शहराची जीवनवाहिनी मानली जाणारी प्रवासी वाहतूक, वीज वितरण, पाणीपुरवठाया सगळ्या क्षेत्रांमध्ये खाजगी कंपन्यांचा वाढता हस्तक्षेप दिसतो आहे.

निर्णय सभागृहात घेतले जात असल्याचा दावा केला जातो; मात्र फायली कुठल्या वेगाने सरकतील, कोणत्या कंपनीला कंत्राट मिळेलहे पडद्याआड ठरवलं जात असल्याची कुजबुज आहे.

पुनर्विकासाच्या नावाखाली शहरातील मोक्याच्या भूखंडांवर कॉर्पोरेटचा थेट डोळा असल्याचा आरोप आता अधिक ठळक होतो आहे. धारावीनंतर आता जिजामाता उद्यान, आर्थर रोड कारागृह, एअर इंडिया कॉलनी, कालिना, मुंबई विद्यापीठ (कालिना कॅम्पस)चा परिसर आणि महालक्ष्मी रेसकोर्सया सगळ्या ठिकाणांच्या टीडीआर व एफएसआयवर बड्या कॉर्पोरेट्सची नजर असल्याची चर्चा आहे. म्हणजेच, जमीन सार्वजनिक; पण लाभ खासगीअसा सरळसोट आरोप.

सभागृहात राजकीय पक्ष शक्तीप्रदर्शन करतात, घोषणांची तोफ डागतात; पण पडद्याआड ठेक्यांचे गणित, स्थायी समितीवरचा ताबा आणि फायलींची गतीयाच निकषांवर महापौरपद ठरवलं जात असल्याचं बोललं जातं.

# सुपारीचे आणखी व्यापारी रडारवर

**नागपूर, दि. १९**

उपराजधानीतील पाच सुपारी व्यावसायिकांच्या २० हून अधिक प्रतिष्ठानांवर शुक्रवारी २४ तासांहून अधिक काळ झडती घेत केंद्रिय आयकर विभाग आणि सक्त वसुली संचालनालयाच्या पथकांनी प्रत्येक उलाढाल खंगाळली. कोट्यवधींच्या कर चोरी प्रकरणात बेहिशेबी उलाढालीशी निगडीत कच्च्या व्यवहारांची कागदपत्रे पथकांच्या हाती लागले आहेत. कच्च्या नोंदीच्या या उलाढालीत अनेक व्यापाऱ्यांची नावे समोर आल्याने सुपारी व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

एकट्या नागपुर शहरात १५० हून अधिक सुपारी व्यावसायिक आहेत. त्यात आयकर विभागाच्या पथकाने शुक्रवारी नागपुरात झडती घेण्यापूर्वी सर्वांत मोठे सुपारी व्यापारी राजू अन्ना याला नवी दिल्लीतून अटक केली होती. त्या नंतर आयकर विभाग आणि सक्तवसुली संचालनालयाने शुक्रवारी रात्रीपासून झडती सुरू केली. ती शनिवारी रात्रीपर्यंत सलग २४ तासांहून अधिक चालली. या झडतीत आसिफ कलिवाला, गनी खान, कळममनातील व्यापारी राजू अन्ना सनई, हाजी अशरफ दलाल, आणि राजेश चिनॉय या पाच सुपारी व्यावसायिकांचे दुकान, घर आणि गोदामातील कागदपत्रे पथकांनी खंगाळली.

फुकट नगर, शांती नगर, मस्कासाथ, महेश नगर, सराफा ओळी परिसरातील २० ठिकाणी हे छापे पडले. आयकर विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आणखी काही व्यापारी पथकाच्या रडारवर आले आहेत. त्यामुळे वाडी भागातील अग्रवाल, इतवारीतील गोयल आणि वडधाना येथील सुपारी व्यापाऱ्यांचा हस्तक रतन पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

आयकर विभागाची कधीही कारवाई होऊ शकते, या धास्तीने सुपारी अनेक व्यावसायिकांमध्ये हालचाली सुरू झाल्या आहेत. काही व्यापाऱ्यांनी केरळ, तमिळनाडू आणि आंध्रप्रदेशातील श्रीशैलम येथील ट्रेडर्सकडे नोंदवलेला कच्चा खरेदी व्यवहार तात्पुरता थांबवला आहे. नागपुरातील सुपारी व्यावसायिक दक्षिण भारतातील श्रीशैलम येथील राजा ट्रेडर्स, टुकुगुडा, महेमुबनगर, केरळमधील मोगुल ट्रेडिंग, एर्नाकुलम, कोझोकोड आणि कर्नाटकातील व्यंकय्या, गणेशप्रसाद ट्रेडर्सकडून खरेदी करतात. आयकर विभाग आणि सक्तवसुली संचालनालयाच्या पथकांनी केलेल्या छापे सत्रामुळे व्यापाऱ्यांनी पुढील उलाढाल थांबवल्याची माहिती आहे.

## कारच्या धडकेने दुचाकीस्वार जखमी

**नागपूर, दि. १९**

कारची धडक बसल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना अमरावती मार्गावरील डिफेन्स गेट क्र. २ समोर घडली.

जखमी प्रदीप धर्मपाल मन्नी (४६) रा. बक्षी ले आऊट, खडगाव रोड यांचे अमरावती मार्गावर द स्टार लाईट नावाचे रेस्टॉरेंट आहे. रविवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास मन्नी हे त्यांच्या अॅक्टीवा दुचाकीने रेस्टॉरेंटकडे जात होते. डिफेन्स गेट २ समोरून जात असताना एमएच ४९ यू २२६८ क्रमांकाच्या आय १० कारचालक बंटी माधव हांडे (३२) यांनी आपली कार वेगात चालवून मन्नी यांना जोरदार धडक दिली. गंभीर अवस्थेत त्यांना खाजगी दवाखान्यात भरती करण्यात आले आहे. याप्रकरणी वाडी पोलिसांनी अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.




युवाराष्ट्र दर्शन

# भंडारा

मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ जिल्हा

## रोंघा येथील जंगलाज वाघाने पाडला दोन गायींचा फडशा

**तुमसर :** तुमसर तालुक्यातील आदिवासी व जंगलव्याप्त भागातील रोंघा येथील जंगलात शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ रोजी सायं. ५ वाजताच्या सुमारास दबा धरून बसलेल्या वाघाने गायींच्या कळपावर हल्ला चढवून दोन गायी ठार केल्याची घटना घडल्याने पशुपालकांत भितीचे वातावरण पसरले असून त्या वाघाचा व वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी व पशुपालकांकडून केली जात आहे.

तुमसर तालुक्याअंतर्गत येणाऱ्या रोघा लेंडेझरी परिसर घनदाट जंगलव्याप्त असून जंगलात वाघ, बिबट व अन्य हिंस्त्र प्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या परिसरात पशुपालकांच्या पाळीव जनावरांवर हल्ले होण्याच्या घटनेत वाढ झाली आहे. सायंकाळ होताच प्रत्येकजण वन्यप्राण्यांच्या भितीने घराची वाट धरत आहेत. कधी वाघाचा हल्ला होणार हे सांगता येणे शक्य नाही. त्यामुळे रात्रीच्या सुमारास घराबाहेर जाणे रोंघा येथील नागरिकांना अवघड झाले आहे. दि. १७ जानेवारी ला नेहमीप्रमाणे गुराखी जंगलात गायी चारत असतांना वाघाने हल्ला चढवून दोन गायी ठार केल्या. त्यामुळे पशुपालक धनराज सोनवाने रा. रोघा या पशुपालकाचे मोठे नुकसान झाले आहे.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२



# शहरातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

■ भंडारा नगर परिषदेची अतिक्रमणावर कारवाई
■ गांधी चौक ते बस स्थानक मार्गावरील अतिक्रमण काढले

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** भंडारा नगर परिषदेच्या वतीने शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी व सार्वजनिक रस्ते अतिक्रमणमुक्त करण्याच्या उद्देशाने बस स्थानक ते गांधी चौक या मुख्य मार्गावर आजपासून अतिक्रमण हटाव कारवाई सुरू करण्यात आली आहे. भंडारा नगर परिषदे द्वारा राबविण्यात आलेल्या अतिक्रमण निर्मूलन मोहिमे दरम्यान ६० ते ७० कच्च्या व पक्क्या स्वरूपाचे अतिक्रमण काढण्यात आले.

१०० दिवस विशेष कृती आराखडयाची अंमलबजावणी करताना नगरपरिषदेद्वारा ही अतिक्रमण काढण्याची कारवाई केली जात आहे. काही दिवसांपूर्वी खात रोड परिसरातील रस्त्यावर आलेले व वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे अतिक्रमण करण्यात आल्यानंतर आज १९ जाने. रोजी शहरातील गांधी चौक, पोस्ट ऑफिस चौक ते बस स्थानक या मुख्य मार्गावरील अतिक्रमणावर बुलडोजर चालविण्यात आला. बाजारपेठ असून अतिक्रमणामुळे मुख्य रस्ता अरुंद झाला आहे. अतिक्रमण करणाऱ्यांना नगरपालिकेकडून ते काढण्याच्या सूचना देण्यात आल्यानंतरही अतिक्रमण काढले नसल्याने अखेर आज नगरपालिकेने मोहीम राबविली. नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेले या मोहिमेत बांबूचे तात्पुरते दुकान, टिनाचे शेड, सिमेंटचे रपटे, दुकानासमोरील लावण्यात आलेले गट्टू अशा सर्व प्रकारचे अतिक्रमण काढले गेले.

ही मोहीम अशीच चालू राहणार असून अतिक्रमणधारकांनी असलेले अतिक्रमण काढून घ्यावे, असे आवाहन नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पालिकेचे मुख्याधिकारी जुम्मा प्यारेवाले यांच्या मार्गदर्शनात पवन कनोजे, संकेत कोचे, मिथुन मेश्राम, सनी सोनेकर, पवन मोगरे, अंकुश हुमणे, आकाश मेश्राम, सागर रगडे, अरविंद गणवीर सहभागी झाले होते.

# गोसेखुर्द धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** जिल्ह्यातील गोसीखुर्द धरणामध्ये शंभर टक्के पाणीसाठा जमा करण्यात आला आहे असे शासनाचे म्हणणे आहे.मात्र ज्यांची जमीन यात जात नाही त्यांच्या नोंदी रेकार्डवर घेतल्या आहेत. मात्र टाकळी, खमाटा या नद्यांच्या तीरावर असलेल्या गावावर अन्याय करण्यात आला आहे या प्रकरणी योग्य सर्व्हे करण्याची मागणी करण्यात आली आहे.



अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनानुसार शासन माहितीनुसार गोसेखुर्द धरण शंभर टक्के भरले आहे.शेतकऱ्यांच्या शेताचे सर्व्हे ड्रोन द्वारे करण्याचे काम सुरू आहे यापूर्वी सॅटॅलाइट द्वारे सर्वे करण्यात आले होते. अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार ड्रोनद्वारे व सॅटेलाईट द्वारे केलेले सर्वे हे शंभर टक्के खरे आहे. प्रत्यक्षात ज्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये गोसेखुर्द धरणाचे पाणी सन २०२२ मध्ये नव्हते व आजही नाही. त्या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी शासनाने संपादित करून शासन दफ्तरी नोंद करण्यात आली आहे. ही शासनाची फसवणूक आहे. प्रत्यक्षात ज्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी शिरले आहे त्याच शेतकऱ्याची शेतजमीन गोसेखुर्द धरणात संपादित करण्यात यावी तसेच टाकळी, खमाटा हे गाव वैनगंगा आणि सूर नदीच्या मध्यभागी आहे.

या ठिकाणी शेती करणे अवघड आहे. त्यामुळे या गावातील संपूर्ण शेती संपादित करावी.गोसीखुर्द येथील अधिकारी, तलाठी ,मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय येथील अधिकारी यांची संयुक्त कमेटी नेमून प्रत्यक्ष शेतकऱ्यासमक्ष सर्व्हे करण्यात यावे . तशी सूचना ग्रामपंचायतला लावण्यात यावी. अशी मागणी अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर भिवगडे, कार्याध्यक्ष विष्णुदास लोणारे , नितेश बोरकर, प्रमोद भांडारकर दीपक खादाडे यांनी जिल्हाधिकारी सावनकुमार यांच्यामार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन तसेच पालकमंत्री भंडारा जिल्हा यांना पाठविण्यात आले. मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला .

## अपघातात जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**तुमसर :** तालुक्यातील चिचोली येथील अक्षय (टिनू) विनोद जाऊळकर यांचा काही दिवसपूर्वी अपघात झाला होता आणि त्यांचा नागपूर येथील रुग्णालयात उपचारादरम्यान दिनांक १८ जानेवारीला मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूने गावात शोककळा पसरली असून त्यांच्यावर दिनांक १९ जानेवारीला स्थानिक मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या परिवारात आई, वडील, एक भाऊ असा आप्त परीवार आहे.

## बाळापूर-हमेशा डोंगरी बुजुर्ग परिसरातील खाणींमध्ये 'कृत्रिम टेकड्यांचे साम्राज्य'



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**तुमसर :** तालुक्यातील बाळापूर-हमेशा डोंगरी बुजुर्ग परिसरात एक असे दृश्य उदयास आले आहे जे पाहून कोणीही थक्क होईल. दुरून पाहिल्यास असे दिसते की सातपुडा येथील उंच डोंगर उंच आणि उंच होत आहेत. हे निसर्गाचे काम नाही तर मानवी उत्खननाचे परिणाम आहे. डोंगरी मॅंगनीज खाणींमधून दररोज काढले जाणारे माती, रेती आणि दगड कृत्रिम पर्वतांच्या विशाल साखळ्या तयार करत आहेत.

दरवर्षी, राख आणि रेतीचे हे पर्वत उंच आणि रुंद होत आहेत, जणू काही पृथ्वीच्या पृष्ठभागावर एक नवीन पर्वतीय साम्राज्य उभे राहिले आहे. परंतु सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, हा खजिना देशाच्या विकासाचा कणा कुठे बनू शकतो. देशभरात महामार्गांचे एक विशाल जाळे बांधले जात आहे आणि रेल्वे जलद गतीने बांधली जात आहे. कोट्यवधी रुपयांचे रस्ते, पूल आणि बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. परंतु सरकार आवश्यक माती, रेती आणि वाळू मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत आहेत. दरम्यान, बाळापूरमधील हे मौल्यवान खाण अवशेष, जे सोन्याच्या खाणीइतकेच मौल्यवान आहे, ते धुळीत धूळ खात पडले आहे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, या कृत्रिम पर्वतांमधील साहित्य रस्ते बांधण्यासाठी, पूल बांधण्यासाठी, नवीन वसाहतींसाठी पाया घालण्यासाठी, भूमिगत खाणी भरण्यासाठी आणि उच्च दर्जाची वाळू तयार करण्यासाठी वापरले जाऊ शकते. हा संपूर्ण देशाच्या बांधकाम उद्योगासाठी "विकासाचे केंद्र" ठरू शकतो.

## आसोला ते आथली मार्गावर बिबट्याचा रुबाब




**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** जिल्ह्यात, विशेषतः लाखांदूर, तुमसर आणि इतर ग्रामीण भागांत बिबट्यांचे दर्शन आणि दहशतीची अनेक प्रकरणे दिवसागणिक समोर येत आहेत. ज्यात सीसीटीव्ही फुटेज, पाऊलखुणा आणि कधी बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन होत आहे. काल रात्रीच्या सुमारास आसोला ते आथली या मुख्य मार्गावर बिबट्याने दर्शन दिल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. एका चारचाकी वाहनधारकाने हा थरार आपल्या कॅमेऱ्यात कैद केला असून, बिबट्या निर्धास्तपणे रस्ता ओलांडतानाचा हा व्हिडिओ चांगलाच प्रसारित होत आहे.

भंडारा जिल्ह्यात बिबट्या दिसणे ही एक सामान्य घटना बनली आहे. विशेषतः नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प आणि आसपासच्या जंगलव्याप्त भागांमुळे जिथे अलीकडेच दुर्मिळ काळ्या बिबट्याचे सुद्धा दर्शन होत आहे. बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेकदा वन्यजीव आणि मानवी वस्ती यांच्यातील संघर्षामुळे बिबट्या मानवी वस्तीत शिरल्याच्या घटना घडतात.

जंगलात आढळणारा बिबट्या आता मानवी वस्तीकडे आगेकूच करू लागले आहेत. फेब्रुवारी २०२२ मध्ये खैरीपट गावात बिबट्याच्या दहशतीमुळे वनविभागाने तळ ठोकला होता. डिसेंबर २०२५ मध्ये लाखांदूर येथे शिकारीच्या शोधात जंगलातून गावात आलेल्या बिबट्याचा सीसीटीव्ही फुटेज समोर आला होता, ज्यात बिबट्या कोंबड्यांवर झडप मारत असल्याचा थरार सीसीटीव्ही मध्ये कैद झाला होता.

# शेतकरी परदेश अभ्यास दौऱ्यावर रवाना

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने शेतकऱ्यांच्या ज्ञानवृद्धी व आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने 'शेतकरी परदेश अभ्यास दौरा योजना' राबविण्यात येत आहे. सन २०२५-२६ या वर्षात तीन अभ्यास दौरे नियोजित आहेत. त्यामध्ये युरोप, इस्त्राएल आणि मलेशिया, व्हिएतनाम, फिलिपाईन्स या देशांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी मलेशिया, व्हिएतनाम व फिलिपाईन्स या तीन देशांचा एकत्रित अभ्यासदौरा परदेशात रवाना झाला आहे.



सदर दौऱ्यातील सहभागी शेतकऱ्यांनी पुणे येथून मुंबई मार्गे पुढे प्रस्थान केले असून, या दौऱ्यामध्ये राज्यातील १५ प्रगतशील शेतकरी, १ कृषी विभागाचा अधिकारी तसेच १ प्रवासी कंपनीचा प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

दौरा निघताना कृषीमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून सहभागी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अभ्यास करून तो अनुभव राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन केले.

या अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, संरक्षित शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, निर्यातक्षम उत्पादन तंत्रज्ञान, तसेच विविध देशांतील कृषी व्यवस्थापन व विपणन व्यवस्था यांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. या अनुभवाचा उपयोग करून राज्यातील शेती अधिक उत्पादनक्षम व शाश्वत करण्यास मदत होणार आहे.

विशेष बाब म्हणजे, सन २०१९ नंतर आयोजित करण्यात आलेला हा पहिलाच परदेश अभ्यास दौरा असून कृषी विभागाने पुन्हा एकदा ही महत्वाकांक्षी योजना प्रभावीपणे राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे कृषी विभाग या उपक्रमाबाबत सकारात्मक आहे. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळून राज्यातील शेती विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.

## बेला येथील यशदाचा उपचारादरम्यान मृत्यू

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**भंडारा :** येथून जवळच असलेल्या बेला येथे दि. १७ जानेवारी रोजी धक्कादायक व दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. दुकानाच्या पायऱ्यावरून जमिनीवर कोसळलेल्या तरूणीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यशदा संजय गाढवे रा. बेला असे मृत पावलेल्या तरूणीचे नाव आहे.



मृतक ही दि. १५ जानेवारी रोजी सामान घेण्यासाठी दुकानात गेली होती. अचानक ती पायऱ्यावरून जमिनीवर पडली. त्यात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन जखमी झाली. जखमीला उपचाराकरीता नागपूरला हलविण्यात आले. तेथे एका खाजगी रूग्णालयात तिचेवर उपचार सुरू असतांना १७ जानेवारी रोजी सायं. ४ वाजता प्राणज्योत मालवली. मृतक यशदा ही १२ व्या वर्गात शिकत होती. परिवारात एकुलती एक होती. माजी जि.प. सभापती संजय गाढवे यांची मुलगी असून तिच्या मृत्यूने गावात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## लोभी शाळेच्या शिक्षक टंचाईवर आमदार सुधाकर आडवले यांचा थेट हस्तक्षेप

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**नाकाडोंगरी:-** तुमसर तालुक्यातील लोभी येथील प्राथमिक शाळेत गंभीर शिक्षक टंचाई असल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीची दखल घेत माननीय शिक्षक आमदार सुधाकर आडवले यांनी प्रकरणावर थेट हस्तक्षेप केला. जिल्हा परिषद सदस्य राजू देशभ्रतार( आष्टी क्षेत्र) तसेच माजी उपसभापती पंचायत समिती तुमसर शिशुपाल गोपाले यांच्या निवेदनानंतर आमदार आडवले यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना दोन-तीन दिवसांत शिक्षक उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट व ठाम निर्देश दिले.

विद्यार्थी संख्या मोठी असताना केवळ एका शिक्षकावर संपूर्ण शाळेचा भार टाकणे ही बाब शासनाच्या शिक्षण धोरणाच्या पूर्णतः विरोधात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही. दोनझतीन दिवसांत शिक्षक द्यावे, अन्यथा जबाबदारी निश्चित केली जाईल,' असा इशाराही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.

लोभी शाळेतील शिक्षक टंचाईमुळे पालकांमध्ये तीव्र असंतोष असून आंदोलनाची तयारी सुरू होती. मात्र आमदार सुधाकर आडवले यांच्या ठाम भूमिकेमुळे शिक्षण विभागावर दबाव निर्माण झाला असून लवकरच शिक्षक नियुक्ती होऊन विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> लोभी शाळेतील शिक्षक टंचाई ही प्रशासनाची गंभीर हलगर्जी आहे. दोनझतीन दिवसांत शिक्षक न दिल्यास आंदोलनाला पाठिंबा देऊन शिक्षण अधिकाऱ्यांवर थेट कारवाईची मागणी करणार.
>
> **शिशुपाल गोपाले,**
> **माजी उपसभापती**
> **पंचायत समिती तुमसर**

# खेळाडूंमधील सुप्त गुण ओळखा,संधी द्या - तहसीलदार निलेश कदम

### लवारी येथे तालुका स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा शुभारंभ

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**
**साकोली :** प्रत्येक खेळाडूच्या अंगी असलेले गुणकौशल्य ओळखून त्यांना विविध स्तरांवर सामने खेळण्याची संधी दिली पाहिजे, असे प्रतिपादन तहसीलदार निलेश कदम यांनी केले. उमरी / लवारी येथे सोमवार दि. १९, मंगळवार दि. २० व बुधवार दि. २१ जानेवारीदरम्यान आयोजित त्रिदिवसीय साकोली तालुका स्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या महोत्सवात तालुक्यातील सुमारे ५० ते ६० शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषद सभापती शितल राऊत, तहसीलदार निलेश कदम, गटविकास अधिकारी पी. व्ही. जाधव, गटशिक्षणाधिकारी विजय आदमने, जिल्हा परिषद सदस्य मदन रामटेके, नारायण वरठे, ज्येष्ठ शिक्षक डी. ए. थाटे, सभापती ललित हेमणे, उपसभापती करूणा वालोदे, पंचायत समिती सदस्य अनिल किरणापूरे, अर्चना इळपाते, गणेश आदे, सरीता करंजेकर, छाया खर्डेकर, सरपंच यशवंत कापगते, उपसरपंचा भुमिता धकाते, केंद्रप्रमुख ए. बी. मेश्राम, सरपंच जयश्री पर्वते, मोहन लंजे, नंदू



कावळे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांनी भव्य पथसंचलन करत मान्यवरांना शिस्तबद्ध सलामी दिली.

यावेळी तहसीलदार निलेश कदम म्हणाले की, ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता असून योग्य मार्गदर्शन व संधी मिळाल्यास हे खेळाडू जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करू शकतात. अशा क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांचे मनोबल वाढते, शिस्त, संघभावना व चिकाटी विकसित होते. त्यामुळे शिक्षक, पालक व प्रशासनाने खेळाडूंच्या गुणांचा शोध घेऊन त्यांना पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

या त्रिदिवसीय महोत्सवात कबड्डी, खो-खो, कुस्ती, लांब उडी, १०० मीटर धावणे, प्रेक्षणीय कवायत तसेच समूहगान व समूह नृत्य अशा विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटनप्रसंगी संचालन शिक्षक टी. आय. पटले व शिक्षिका पात्रीकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामसेवक डी. ए. खुजे, पोलीस पाटील छगन पात्रीकर, स्पर्धा समन्वयक शिक्षकवृंद वाय. व्ही. ढवळे, ललिता ब्राह्मणकर, माध्यम प्रतिनिधी आशिष चेडगे यांच्यासह तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे मुख्याध्यापक, सहाय्यक शिक्षक विविध समित्यांद्वारे सक्रिय सहकार्य करीत आहेत.

# सेवाग्राम-हमदापूर मार्गावरील खड्डयांची डागडूजी सुरू

## साबांविला ८ महिन्यांनंतर कुंभकर्णी निद्रेतून आली जाग



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि.१९**

सेवाग्राम ते हमदापूर मार्गाची स्थिती अत्यंत दयनीय आणि खराब झाली आहे. रस्त्यात खड्डे आहेत की खड्डयांत रस्ता आहे, हे समजतच नाही. याबाबत सेलू तहसील काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष अतुल पन्नसे यांनी सात-आठ महिन्यांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग, यांना लेखी पत्र दिले होते. पण कुंभकर्णी निद्रेत झोपलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांची निद्रा १७ जानेवारीला उघडली आणि सेवाग्राम-हमदापूर मार्गावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात झाली.

सेवाग्राम-हमदापूर मार्गावर जागोजागी खड्डे पडल्याने नागरिकांना मार्गक्रमण करताना अडचणीचा सामना करावा लागत होता. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या होत्या. परंतु याकडे दुर्लक्ष केल्या जात होते.आता सार्वजनिक विभागाची झोप उडाली असुन रस्त्याची डागडूजी करण्यास सुरुवात करण्यात आली. ७ महिन्यांपूर्वीच याकडे लक्ष दिले असते तर या मार्गावरून जाणाऱ्या सर्व वाहनचालकांची दुर्दैव टाळता आले असते.या विलंबाबद्दल प्रशासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करेल की हाच प्रकार चालू राहील, असा प्रश्न स्थानिक नागरिक विचारत आहेत.

# कोटेश्वर देवस्थानच्या विकासासाठी विविध कामांची केली पायाभरणी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. १९**

देवळी तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र कोटेश्वर देवस्थान येथे भाविकांच्या सोयी सुविधा वाढवणे, देवस्थानचा सर्वांगीण विकास आणि धार्मिक पर्यटनाला चालना देणे, यासह विविध कामांची पायाभरणी आमदार राजेश बकाणे यांच्या हस्ते करण्यात आली,

यावेळी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष चंद्रशेखर येरावार, सचिन विरेंद्र देशपांडे, देवळी नगर परिषद उपाध्यक्ष राहुल चोपडा, मिलिंद भेंडे, स्वप्नील खडसे, संजय बिन्नोड, मंगला चोरे यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते, मंदिर ट्रस्टच्या वतीने विकास कामामुळे भाविकांना होणाऱ्या लाभांची माहिती देत आमदार राजेश बकाने यांचे आभार मानण्यात आले, या विकास कामामुळे भविष्यात भाविकांची संख्या वाढून परिसरातील सामाजिक व आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी आमदार राजेश बकाने म्हणाले की, कोटेश्वर देवस्थान हे केवळ धार्मिक आस्थेचे केंद्र नसून सांस्कृतिक वारसा जपणारे तीर्थक्षेत्र आहे, भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आणि देवस्थानचा विकास करणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, शासनाच्या माध्यमातून अशा तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी सातत्याने निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले, सोबत आवश्यकतानुसार विकास कामे केली जातील, असेही यावेळी उपस्थितांना सांगितले.

# संत केजाजी महाराज पुण्यतिथी उत्सव

## हरीनामाच्या जयघोषाने दुमदुमली घोराड नगरी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**सेलू, दि. १९**

विदर्भाची प्रतीपंढरी श्रीक्षेत्र घोराड येथे संत केजाजी महाराजांची ११९ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त पालखी दिंडी सोहळयात विविध गावांतील ३२० चे वर भजनी मंडळीसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. गावात भक्तांचा जनसागर उसळला होता यामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते गावात जणू भक्तीचा मळा फुलल्याचे चित्र पाहायला मिळाले यात टाळ मृदगांचे तालावर नाचणारे वारकरी आणि हरिनामाचा गजर पाहता संत केजाजी महाराजांचे जयघोषाने घोराड नगरी जणू दुमदुमली होती

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरातून सकाळी अकरा वाजता पालखी निघाली यावेळी मुख्यप्रवेशद्वारावर रथाचे पुजन ,ज्ञानेश्वर महाराज भादंककर तथ अभ्युदय मेघे यांचे हस्ते पार पडले यात विविध मंडळानी तयार केलेले आकर्षक रथ, दाखल झालेले अश्व, बँडपथक, आणि भजनी मंडळाचा सहभाग असलेला हा दिंडी सोहळा हरिनामाचा जयघोष करीत मुख्य मंदिराला प्रदक्षिणा घालत संत नामदेव महाराज समाधी स्थळावर पोहचल्यावर तिथे अश्वाचे रिंगण पार पडले यावेळी हातात भगव्या पताका घेत धावणारे वारकरी, विणेकरी, पकवाज वादक, डोक्यावर तुळसी वृंदावन, पारायण गाथा घेऊन धावा करीत सहभागी झालेल्या महिला आणि हरीपाठ मंडळाचे वतीने मानवी साखळी द्वारे उंच मनोरा करीत वाजविला जाणारा पकवाज हे सगळे क्षण डोळयाचे पारणे फेडणारे ठरले हे क्षण पाहण्यासाठी मैदानावर भाविकांची महिलांची मोठी गर्दी उसळली होती या पालखी सोहळ्यानिमित्त गावातील रस्त्यावर महिलांनी रांगोळ्या काढून रस्त्याची सजावट करण्यात आली होती ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या पालखी गावातील प्रमुख मार्गाने जात असताना ठिकठिकाणी पालखीचे स्वागत करण्यात आले यात सहभागी भाविकांच्या सोयीसाठी ठिकठिकाणी अल्पोपोहार, चहापाण्याची व्यवस्था ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती मुख्य मार्गाने दिंडी पालखी ग्रामपंचायत मार्गे दुपारी पाच वाजता मुख्य मंदिराजवळ येताच या दिंडी सोहळ्याची सांगता झाली त्यानंतर आलेल्या भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

# भारतीय सैनिक हे भारताच्या सार्वभौमत्वाचे खरे रक्षक - मुख्याध्यापक गायकवाड

## कस्तुरबा विद्या मंदिरात आर्मी दिन साजरा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१९**

१५ जानेवारी १९४९ रोजी भारतीय सैन्याची धुरा जनरल के. एम. करिअप्पा यांच्या हाती आली आणि त्यानंतर भारतीय सैन्याची ओळख ही केवळ शस्त्रबळ नव्हे तर शिस्त, मूल्ये आणि लोकशाहीवरील निष्ठा अशी निर्माण झाली.स्वातंत्र्योत्तर काळात सीमांचे रक्षण, नैसर्गिक आपत्तीतील मदतकार्य, शांतता प्रस्थापनेसाठी दिलेले योगदान आणि आजही सीमेवर अहोरात्र सज्ज असलेले जवान हे भारताच्या सार्वभौमत्वाचे खरे रक्षक असल्याचे मत एनसीसी अधिकारी तथा मुख्याध्यापक गायकवाड यांनी व्यक्त केले.

कस्तुरबा विद्या मंदिर, सेवाग्राम येथे २१ महाराष्ट्र एन सी सी बटालियन वर्धा च्या अंतर्गत शाळेच्या एन.सी.सी. विभागाच्या वतीने आर्मी दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. यावेळी मंचावर वरिष्ठ शिक्षिका नम्रता लाखे ,माजी सैनिक महेश ढोबळे, सुभेदार अशोक रंगारी, रविन्द्र फुलमाळी, अशोक नगराळे व संदीप दुधे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शिस्तबद्ध व सैनिकी परंपरेनुसार करण्यात आली. सर्वप्रथम एन.सी.सी. सीएचएम कॅडेट अक्षरा खराटे हिने आपल्या अधिकाऱ्यांना सन्मानपूर्वक रिपोर्ट सादर करून कार्यक्रम सुरू करण्याची परवानगी मागितली. त्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली. राष्ट्रगीतानंतर देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यानंतर आर्मी दिनाचे औचित्य साधून आजी व माजी सैनिकांचा गौरव व सत्कार सोहळा पार पडला. यावेळी संदीप दुधे, तसेच माजी सैनिक अशोक रंगारी, महेश ढोबळे, रवींद्र फुलमाळी व म्अशोक नगराळे यांचा मुख्याध्यापक उमेश गायकवाड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.भारतीय सेना व देशसेवेसाठी दिलेल्या अतुलनीय कार्य व दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा भारतीय सेना दिवसानिमित्त गौरव व सत्कार करण्यात आला.

यावेळी एन.सी.सी. कॅडेट भूमी खापेकर हिने प्रशिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वात झालेला सकारात्मक बदल याविषयी विचार मांडले.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका भारती गेडाम यांनी अत्यंत प्रभावी, मुद्देसूद व प्रेरणादायी शैलीत केले. त्यांच्या संचालनातून कार्यक्रमाची उद्दिष्टे व आर्मी दिनाचे महत्त्व अधोरेखित झाले. पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापक उमेश गायकवाड यांनी करून दिला, तर आभार भारती गेडाम यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयश्री झाडे, सोनल गुडसुंदरे, रेखा नवघरे, अंजली ठाकरे, प्रेरणा सावल, तृप्ती जामीनकर, किरण गौरखेडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता 'हम सब भारतीय है' या देशभक्तीपर गीताने करण्यात आली.

### शिवीगाळ केली, मारण्याची धमकी

**वर्धा :** शिवीगाळ करण्यास हटकले असता युवकाला मारण्याची धमकी दिली, ही घटना केदार लेआऊट परिसरात घडली, युगांत तऱ्हेकर (२५) हा मित्रासोबत बोलत असताना, अक्षय झोरे हा तेथे आला, त्याने वाद केला, युगांतने शिवीगाळ करण्यास हटकले असता अक्षयने अश्लील शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिली.

# जखमी युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा, :** अपघातात गंभीर जखमी युवकाचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला, आयुष ठवकर रा. नागपूर हा अमरावती येथे दुचाकीने कामानिमित्त गेला होता, दरम्यान, नागपूर येथे परत येत असताना तळेगाव जवळ दुचाकी घसरुन तो गंभीर जखमी झाला, रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान मृत्यू झाला, या प्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

# पीएमश्री विद्यालयात छात्र सैनिकांची अ प्रमाणपत्र परीक्षा

## आर्वी, आष्टी ,पुलगाव येथील विविध शाळांतील १८० छात्र सैनिकांचा सहभाग



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी,दि.१९**

स्थानिक पीएमश्री नगरपरिषद गांधी विद्यालयात एनसीसी छात्र सैनिकांची अ प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये नगरपरिषद गांधी विद्यालयातील एकूण ५५ छात्र सैनिक,हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय मधील एकूण २५ छात्रसैनिक तसेच लोकमान्य विद्यालय आष्टी येथील २७ छात्रसैनिक, ज्ञानभारती विद्यालय पुलगाव येथील ४८ छत्र सैनिक आणि इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव येथील २५ छात्र सैनिक सहभागी झाले होत.

विद्यार्थ्यांची ड्रिल, मॅप रीडिंग, वेपण ट्रेनिंग, फील्ड क्राफ्ट, बॅटल क्राफ्ट यासंबंधीचे ग्राउंड वरील ॲक्टिव्हिटी आणि परीक्षा घेण्यात आली. तसेच १८ जानेवारीला त्यांचा लेखी पेपर घेण्यात आला. यासाठी २१ महाराष्ट्र बटालियन नायब सुभेदार निरज सिंग,हवालदारसतीश पुरकर, बद्री प्रसाद, कैलास सिंग अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती. दोन दिवसीय चाललेल्या परीक्षेमध्ये एनसीसी अधिकारी प्रमोद नागरे, संजय शिरसाट, दिनेश चंदिवाले, रवींद्र कुडकले आणि प्रवीण शेळके या एनसीसी अधिकाऱ्यांनी परीक्षा घेतली. एनसीसी वर्धा येथील कमांडणींग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल शांतो के यांनी भेट दिली विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.एनसीसी कार्यालयाला भेट दिली.नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने आणि उपाध्यक्ष गौरव जाजू यांनी एनसीसी छात्र सैनिकांना भेट दिली.एनसीसी छत्र सैनिक हे दोन वर्षाकरिता एनसीसी मध्ये निवडले जातात वर्ग नववी मध्ये त्यांचा दहा दिवसाचा हा कॅम्प अनिवार्य असतो. त्यानंतरच त्यांना एकूण ५०० गुणांची परीक्षा देता येते जे हे विद्यार्थी पास होतील त्यांनाच मुंबई निर्देशालयातर्फे प्रमाणपत्र मिळते जे प्रमाणपत्र त्यांना भारतीय सैन्य,दलांमध्ये, पोलीस दलामध्ये आणि अर्ध सैनिक बल यामध्ये त्यांचे गुण वाढवण्याकरता महत्त्वपूर्ण असते.

प्राचार्य विश्वेश्वर पायले, पर्यवेक्षिका ज्योती अजमिरे यांनी भारतीय सैन्यातील अधिकाऱ्यांचे आणि मान्यवरांचे स्वागत केले.

# बोर व्याघ्र प्रकल्पातून पर्यटनासोबतच व्यवसायाला चालना मिळेल- पालकमंत्री डॉ. भोयर

## बोर व्याघ्र प्रकल्पाच्या रहाटी व ढगा सफारी गेटचे उद्घाटन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा,दि.१९**

बोर व्याघ्र प्रकल्पामुळे पर्यटकांना एक चांगली पर्यटनाची संधी मिळेल. जैवविविधतेचे रक्षण होण्यासोबतच व्यवसायाला चालना मिळेल. तसेच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

बोर व्याघ्र प्रकल्पाच्या रहाटीव ढगा सफारी गेटचे उद्घाटन आज पालकमंत्र्याचे हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला खासदार अमर काळे, आमदार सुमित वानखेडे, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास रेड्डी, माजी जिप अध्यक्षा सरिता गाखरे, उपवनसंरक्षक हरविर सिंग, पेंच व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक अक्षय गजभिये, बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक मंगेश ठेंगडी, बफर क्षेत्राचे सहाय्यक वनसंरक्षक दत्तात्रय लोंढे, संजय गाते, सुधीर दिवे आदी उपस्थित होते.

बोर व्याघ्र प्रकल्पासाठी नवरगाव या गावाचे ज्या पध्दतीने पुनर्वसन करण्यात आले होते, त्याच पध्दतीने बफर क्षेत्रात येणाऱ्या मेटहिरजी, उमरविहिरी, येणीदोडका, मरकसूर व गरमसूर गावाचे पुनर्वसन करण्यात येईल. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गावाच्या पुनवर्सनाच्या मंजूरीसह १०० कोटी रुपये पुनर्वसनासाठी मंजूर केले आहे. या गावांमध्ये चांगल्या सुविधा निर्माण करुन देण्यासोबत येथील नागरिकांना प्रकल्पामध्ये उद्योगाच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर म्हणाले. पर्यटनाच्यादृष्टीने वर्धेकरांसाठी एक चांगली सुरुवात असून यामुळे पर्यटनाला चालना मिळेल. बोर व्याघ्र प्रकल्पासोबतच कौंडण्यपूर, सेवाग्राम यासारख्या पर्यटन क्षेत्राचा सुध्दा विकास करण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करावे?. व्याघ्र प्रकल्पाच्या आजुबाजुच्या परिसरातील शेत जमिनी वन्यप्राण्यांमुळे पडित राहण्याचे प्रमाण वाढत आहे. यासाठी वन विभागाने नियोजन करण्याची गरज असल्याचे खासदार अमर काळे म्हणाले. बोर व्याघ्र प्रकल्पामुळे पर्यटनाला चालना मिळणार असून नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. वन विभागाने पर्यावरणाचे रक्षण करतांना नागरिकांचे रक्षण करणे तेवढेच गरजेचे आहे. यासाठी पशुपालकांच्या चराईचा व पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी वन विभागाने नियोजन करावे, असे आमदार सुमित वानखेडे म्हणाले. बोर अभयारण्याच्या कोर क्षेत्रामध्ये पुर्वी बोर व अडेगाव हे दोन गेट होते आता बफर झोन झाल्यामुळे रहाटी व ढगा हे गेट सुरु करण्यात आले आहे. यामुळे आता पर्यटकांना पर्यटनाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. सोबतच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे. वाढीव बफर क्षेत्रातील पुनर्वसीत करण्यात येणाऱ्या पाच गावाचा विकास करण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याचे श्रीनिवास रेड्डी म्हणाले.

पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते ढगा येथील व त्यानंतर रहाटी येथील सफारी गेटचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी त्यांनी अभयारण्याच्या सफारीचा सुध्दा आनंद घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर यांनी केले. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी विश्वास सिरसाट, बोर व्याघ्र प्रकल्पातील सर्व वन परिक्षेत्र अधिकारी, मानद वन्यजीव रक्षक संजय इंगळे, पिपल्स फॉर ॲनिमलचे आशिष गोस्वामी, वन्यजीव प्रेमी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### शीला साळवे



**वर्धा, :** रामनगर येथील शीला साळवे (वय ८२) यांचे १९ रोजी सेवाग्राम रुग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने उपचारादरम्यान निधन झाले. शीला साळवे यांना जिल्हा सामान्य रुग्णालयातील अनुकरणीय सेवेबद्दल १९८१ साली महाराष्ट्र राज्य नर्सिंग परिषदेने सन्मानित केले होते.त्या न्यू इंग्लिश हायस्कूल येथील शिक्षिका मेरी साळवे यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर २० जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता ख्रिश्चन स्मशानभूमी येथे अंतिम संस्कार होतील.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यास सुरुवात

## जिल्ह्यातील ३८३ गावांचा समावेश, शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि.१९**

महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील निवड झालेल्या ३८३ गावातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने ऑनलाईन नोंदणी व अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान बदलामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यात विविध घटकांसाठी शेतकऱ्यांना शासनाकडून अर्थसहाय्य व अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार आहे. प्रकल्पांतर्गत सिंचन सुविधेसाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच, विहीर पुनर्भरण आणि पाईप व पंप संच, फलोत्पादन व वृक्ष लागवड घटकांतर्गत फळबाग लागवड, बांबू लागवड आणि वानिकी आधारीत वृक्ष लागवड, शेततळे बाबींतर्गत वैयक्तिक शेततळे आणि शेततळे अस्तरीकरण, संरक्षित शेती बाबीकरीता शेडनेट हाऊस व हरितगृहामधील लागवड साहित्य, सेंद्रीय शेती व पुरक व्यवसाय बाबीकरीता गांडूळ खत व नाडेप युनिट, रेशीम उद्योग, गोड्या पाण्यातील मत्स्यपालन. पशुपालन बाबीकरीता प्रामुख्याने भूमीहीन कुटूंबे, विधवा, परितत्त्या व घटस्फोटीत महिलांसाठी शेळीपालन व इतर बाबीमध्ये बिजोत्पादन कार्यक्रमासाठी अर्थसहाय्य व अनुदान देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील निवडक गावातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी, महिला शेतकरी आणि अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, तांत्रिक अडचण असल्यास संबंधित गावचे समूह सहाय्यक, सहाय्यक कृषि अधिकारी किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.

